सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन


स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
कोकण भवन, सहावा मजला, नवी मुंबई ४०० ६१४.

☎/ 🖷:-०२२/२७५७१३११. Website : www.mahalfa.in E.Mail : ad.admin@mahalfa.in


क्र.स्था-१८/ब/प्रवासभत्ता देयक/परिपत्रक /लेखा-४/ ९९२ दि :- 4 MAY 2017

## परिपत्रक

संचालनालय स्थानिक निधी लेखापरीक्षा कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी प्रशासकीय कामकाजासाठी तसेच सहसंचालक (मनपालेप) शाखेतील अधिकारी / कर्मचारी लेखापरीक्षण कामकाजाकरीता दौऱ्यावर असतात. सदर दौरा पूर्ण करून त्या कालावधीच्या दैनंदिनी व प्रवास भत्ता देयके मंजूरीस्तव सादर करतात. याबाबत संपूर्ण कार्यालयात एकसूत्रता रहावी म्हणून दि. ०७/०२/२०१७ रोजीचे परिपत्रकान्वये सुचना करण्यात आल्या आहेत. सदर सुचनांचे अनुपालन होणेचे दृष्टीने खालील प्रमाणे सुचित करणेत येत आहे.

१) उपरोक्त परिपत्रकानुसार अधिकारी / कर्मचारी यांनी दि. ०१/०१/२०१७ ते दि. ३१/०३/२०१७ कालावधीचे प्रवासभत्ता देयक दि. १५ मे २०१७ पर्यंत कार्यालयास सादर करावे व त्याचप्रमाणे प्रत्येक तिमाही कालावधीची प्रवास भत्ता देयके सादर करावीत.

२) अधिकारी / कर्मचारी यांनी मंजूरीस्तव सादर केलेल्या दैनंदिन्यांवर वरिष्ठांनी एक आठवड्यात कार्यवाही (मंजूर / नामंजूर) करावी.

३) प्रवास भत्ता देयकातील प्रवासाचा तपशील सुटसुटीत व वाचनीय असावा.

४) मुख्यालय ते मुख्यालय प्रत्येक प्रवास पूर्ण झाल्यानंतर त्या कालावधीतील दैनिक भत्त्याची गणना दर्शविण्यात यावी.

५) ज्या अधिकारी / कर्मचारी यांची अदाता नोंदणी झाली नसेल त्यांनी अदाता नोंदणी करून घ्यावी.

६) देयकात खालील प्रमाणे विहीत प्रमाणपत्रे स्वाक्षरीसह नमुद करावीत.

प्रमाणित करण्यात येते की, (अ) सदरची मागणी यापूर्वी तयार वा सादर केलेली नाही.

(आ) सदर प्रवासासाठी कोणतेही अग्रीम मंजूर वा अदा केलेले नाही.

(इ) देयकात नमूद प्रवास जवळच्या व अनुज्ञेय मार्गाने केलेला आहे.

( प्रताप मोहिते )
संचालक
स्थानिक निधी लेखापरीक्षा
महाराष्ट्र राज्य



C:\Users\Public\Aasthapana\T.A.Bill\TA Letter.docx